facebook - navprahar2023 | navprahar2023 | navprahar2023@gmail.com | www.navprahar.com

RNI Regn no. MAHBIL/2013/54875 Post Regd. No. ATI/RNP/3337/2019-2021

साप्ताहिक नव प्रहार — भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

Social Media Edition

मुख्य संपादक :- संजय पांडे | मो.८५५२९५८५५५ | navprahar2023@gmail.com

सोमवार, दि. १९.६.२०२३

# लेहगाव चौफुली वरील पोलीस चौकी ठरत आहे शोभेची वस्तू!

## अवैध गोवंश वाहून नेणाऱ्या वाहनांबद्दल माहिती देऊन देखील कारवाई नाही | ड्यूटीवर असलेल्या एकमेव कर्मचाऱ्याने काढला पळ

**मोर्शी / दत्तराज इंगळे**

अवैध धंद्यांना आळा बसावा यासाठी बनविण्यात आलेली लेहगाव चौफुली वरील पोलीस चौकी शोभेची वस्तू ठरत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. महत्वाचे म्हणजे या चौकी समोरून कत्तलीसाठी जनावरे जात असल्याची पूर्व सूचना देऊन देखील या चौकीवर कार्यरत एकमेव कर्मचाऱ्याने कारवाई करण्याऐवजी चौकी सोडून पळ काढल्याचा लज्जास्पद प्रकार घडला आहे. यामुळे वरिष्ठांच्या मेहनतीवर पाणी फेरल्या जात असल्याचे देखील उघड झाले आहे. कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करतात याकडे जनतेचे पक्ष लागले आहे.





जिल्ह्यात अवैध व्यवसायावर आळा बसावा यासाठी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी परराज्यातून येणाऱ्या महत्वाच्या रस्त्यावर महत्वाच्या ठिकाणी पोलीस चौकी स्थापन केल्या आहेत. रात्री- अपरात्री येणाऱ्या वाहनांची कागदपत्रे तपसण्यापासून ते संशयित वाहनांची तपासणी करम्याची जबाबदारी या ठिकाणी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांची असते. पण या ठिकाणी तैनात कर्मचारी कर्तव्यात कसूर करीत असल्याची धक्कादायक बाब समोर आले आहे.

**काय आहे नेमके प्रकरण** - या ठिकाणी मॉर्निंग वॉक साठी येणाऱ्या प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहिती नुसार आज सकाळी 6 ते 6.30 च्या दरम्यान ते फेरफटका मारत असतांना त्यांना चौफुली वर एक संशयित इसम बसलेला आढळला. सदर इसम हा अवैध गोवंश तस्करी करणाऱ्या रॅकेट मधील असल्याचे माहीत असल्याने नागरिकांनी चौकी वर कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्याला या बद्दल कल्पना देऊन वाहनांची तपासणी करावी अशी विनंती केली.

**एकटा असल्याचे सांगत काढला पळ** - नागरिकांनी जेव्हा कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्याकडे चौकी समोरून जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्याची बीनंती केली तेव्हा त्याने मी एकटा आणि नवीन आहे असे कारण सांगून कारवाईस टाळाटाळ केली. नागरिकांनी त्याला तुम्ही घाबयू नका आम्ही तुमच्या सोबत उभे राहतो. तुम्ही फक्त वाहनाला हात दाखवून थांबवा . आम्ही लगेच तुमच्या मदतीला येतो अशी विनंती केली. पण हो हो म्हणत त्याने तेथून पळ काढला. ही बाब नागरिकांच्या गाडी चौफुलीवर थांबली नसल्यावर लक्षात आली.

**वरिष्ठांच्या मेहनतीवर अधिनस्थ कर्मचाऱ्यांकडून फेरल्या जात आहे पाणी** - जिल्ह्यात अवैध व्यवसाय जसे गोवंश तस्करी, अवैध गुटखा ,गौण खनिज वाहतूक , वाहन चोरी यावर अंकुश लागावा यासाठी महत्वाच्या रस्त्यावर महत्वाच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी चेक पॉईंट आणि पोलीस चौक्या उभारल्या आहेत. पण याठिकाणी कर्तव्यावर असलेले कर्मचारी प्रामाणिक पणे आपली ड्युटी बजावत नसल्याचे समोर येत आहे.

**संबंधीत ठाणेदार संशयाच्या भोवऱ्यात** - समजा जर संबंधित ठाणेदारांनी एकाच कर्मचाऱ्याची ड्युटी या पॉईंट वर लावली असेल तर हा अवैध व्यावसायिक आणि ठाणेदार यांच्यातील अन ऑफिशियल करार होता काय ? जर नाही आणि त्यांनी जर इतर कर्मचाऱ्याची ड्युटी लावली असेल आणि ते कर्तव्यावर नसतील तर ठाणेदार त्यांच्यावर कोणती कारवाई करतील ? असे नानाविध प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहेत.

**पोलीस अधीक्षकांच्या कारवाईकडे जनतेचे लक्ष** - पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी ते एक प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत हे त्यांनी वेळोवेळी केलेल्या कारवाईतून सिद्ध केले आहे. समोर बकरी ईद असल्याने जिल्ह्यात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये ही दक्षता बाळगणे पोलीस प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे लेहगाव चौफुलीवर घडलेल्या गंभीर प्रकरणात एसपी काय कारवाई करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार असून त्यांच्या भूमिकेकडे जिल्ह्यातील नगरिकांचे लक्ष लागले आहे.

### चौकी वरील कर्मचारी अवैध व्यावसायिकां सोबत मॅनेज असल्याची चर्चा

या चौकीवर कार्यरत कर्मचारी नवीन असतांना एखादं दुसऱ्या वाहनावर कारवाई करतात. त्यानंतर यांच्यात मोबाईल नंबर ची देवाण घेवाण होते. आणि यानंतरच खरा खेळ सुरू होतो. अवैध व्यावसायिक आणि चौकीवर ड्युटीवर असलेले कर्मचारी यांच्यात ड्युटी वर केव्हा राहाल ? गाडी कधी काढायची ? याबद्दल बोलणे झाल्यावरच अवैध व्यावसायिक आपले वाहन संबंधित चौकी समोरून काढतात. आणि सर्वच अवैध व्यवसाय बिनबोभाट सुरू राहतात.

### ड्युटी वर किती कर्मचारी होते याबद्दल माहिती घेणे आवश्यक

या चौकीवर 3 ते 4 कर्मचाऱ्यांची ड्युटी असते असे समजते. त्यामुळे आज दि .18 जून रोजी रात्रपाळी ड्युटीवर किती कर्मचारी होते ? एका पेक्षा जास्त कर्मचारी असतील तर मग सकाळी एकच कसा काय ? आणि उर्वरित कर्मचारी कुठे गेले होते. आणि जर या ठिकाणी एकाच कर्मचाऱ्याची ड्युटी लागली होती तर संबंधित ठाणेदारांनी असे का केले ?

# महाराष्ट्रात बेठबिगारीचा प्रकार उघडकीस

### 11 मजुरांना बांधून ठेवले होते साखळदंडाने

**धाराशिव** - बेठबिगारीच प्रकार पूर्वी आढळत होता. पण जसजसा अशिक्षित पणा कमी होत गेला तसतशी ही प्रथा कमी होत गेली. पण पुरोगामी महाराष्ट्रात धाराशिव जिल्ह्यात 11 मजुरांना साखळदंडाने बांधून ठेवून त्यांच्या कडून विहिरीचे काम करून घेतल्यरा जात होते. त्यांनी पळून जाऊ नये म्हणून त्यांना शौचास देखील जाण्याची मनाई होती.



धाराशिव जिल्ह्यातल्या भूम तालुक्यातला हा कंत्राटदार असून त्याने हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर इथून शेतमजूर आणले होते. हे मजूर दिवसभर विहिरीवर काम करत होते. रात्रीच्या वेळेला या मजुरांनी पळून जाऊ नये म्हणून त्यांना साखळदंडाने बांधून ठेवलं जात होतं. शौचास जायचं असेल किंवा जेवण करायचं असेल तरी या मजुरांना परवानगी दिली जात नव्हती. पोलिसांनी छापा टाकला त्यावेळेला हे मजूर घाबरलेल्या अवस्थेत साखळदंडाने बांधलेले आढळून आले. पोलिसांनी त्यांची सुटका केली आणि शनिवारी रात्री हे मजूर आपल्या गावी परत गेले.

पोलिसांना याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी छापा टाकला आणि मजुरांची सुटका केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदिप रामकिसन घुकसे (वय 23 वर्षे रा. कवठा, ता. सेनगाव जि. हिंगोली) यास बळजबरीने पकडून ठेवले असून त्याच्याकडून दिवसभर विहिरीचे काम करुन घेतात. मिळालेल्या माहितीवप मिळाल्यावरुन अतुल कुलकर्णी यांनी एक पथक तयार केले. या पथकाने मिळालेल्या ठिकाणी जाऊन शेध घेतला असता त्याठिकाणी भगवान अशोक घुकसे, (26 वर्षे, रा. कवठा ता. सेनगाव जि. हिंगोली)यांच्यासह मारुती पिराजी जटाळकर (वय 40 वर्षे,रा. आतकुर, ता. धर्माबाद), राजू गनुलाल म्हात्रे (वय 22 वर्षे रा मध्येप्रदेश), मंगेश जनार्दन कानटजे (वय 26 वर्षे, रा. कुलमखेड, मा. बुलढाणा, बालाजी शामराव वाघमारे (वय 32 वर्षे, रा.लिंबा, ता. देगलूर जि. नादेंड), गणेश अशोक पवार,(वय 30 वर्षे, रा. नाशिक) साखळदंडाने बांधलेले आढळून आले.

वाखरवाडी येथील मजुरांकडे चौकशी केली त्यांनी माहिती दिली की, संतोष शिवाजी जाधव(गुतेदार) दिवसा बळजबरीने विहीरीवर आमच्याकडून काम करुन घेत असे. त्यानंतर संध्याकाळी पळून जाऊ नये म्हणून हाता पाय साखळीने ट्रॅक्टरला बांधून ठेवत असे पोलीस स्टेशन ढोकी हद्दीतील व शिराढोण हद्दीतून एकूण अकरा इसमांची सुटका करुन पोलीस स्टेशन ढोकी येथील पोलीस पथकाने आणि पोलीस मित्र विशाल कानगे यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कामगिरी केली आहे. ढोकी हद्दीत कोणी संशयीतरित्या दिसल्यास किंवा काही माहिती मिळाल्यास त्याबाबतची माहिती पोलीस स्टेशन ढोकी येथे द्यावी असे आवाहन केले आहे.

# रेतीने भरलेल्या ट्रकची चाबी घेऊन मालक-चालक पसार

## बिझीलॅन्ड मार्केटजवळ रेती तस्करांची पोलिसांशी हुज्जतबाजी

### रेतीची चोरी करून सरकारी कामात केला अडथळा

**अमरावती** - रेती तस्करी करणार्या ट्रकला महसूल विभागाच्या अधिकार्यांनी बिझीलॅन्ड मार्केटच्या प्रवेशद्वाराजवळ पकडले. परंतू ट्रक चालकाने पोलिसांशी हुज्जतबाजी करून ट्रकची चाबी काढून पलायन केले. त्यामुळे रेतीची चोरी करून ट्रक मालक व चालकांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या घटनेची तक्रार नायब तहसिलदार टिना विलास चव्हाम (45, रा. संकेत कॉलनी) यांनी शनिवार, 17 जून रोजी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी टिप्पर क्रमांक एमएच 12 एसएफ 3167 चा चालक व टिप्पर मालक गौरव सांहिदे (रा. अमरावती) यांच्याविरुध्द रेती चोरी व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला.



नायब तहसिलदार टिना चव्हाण यांनी 17 जून रोजी मंडळ अधिकारी विशाल धोटे, तलाठी राजेश दंदे, मंगेश सोळंके व कोतवाल गजानन खंडारे यांना सोबत घेऊन अवैध रेती वाहतुकीची मोहिम राबविली. या अनुषंगाने त्यांनी बिझीलॅन्ड मार्केटच्या प्रवेशद्वाराजवळ एका टिप्परला थांबविले आणि तपासणी केली. त्यावेळी टिप्परमध्ये 7.04 ब्रास रेती आढळून आली.

त्यामुळे महसुल पथकाने टिप्पर नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात जमा करण्यास सांगितले. परंतु त्यानंतर टिप्परचा मालक तेथे पोहोचला. त्याने पोलिसांशी हुज्जतबाजी केली. टिप्पर मालकाने रेतीची रॉयल्टी दाखविली असता, त्यात पाच ब्रास रेतीची रॉयल्टी होती. त्यामुळे 2.04 ब्रास रेती चोरून नेली जात असल्याचे महसुल पथकाला दिसले.

दरम्यान टिप्पर मालकाने टिप्परची चाबी काढून घेतली आणि कारमध्ये बसून तेथून पळून गेला. त्यानंतर टिप्पर चालकाने विना चाबीने टिप्पर सुरु करून पळून गेला. त्यामुळे महसुल अधिकार्यांनी या घटनेची तक्रार नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात नोंदविली.

# बालिकेवरील लैंगिक अत्याचार प्रकरण - आरोपीला जामीन

**अमरावती, दि. 18 (प्रतिनिधी)** - एका बारा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणातील आरोपीचा न्यायालयाने जामीन केला. पवन बिसाळ असे जामीन मिळालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणात ॲड. सपना जाधव यांनी आरोपीच्या बाजुने न्यायालयात यशस्वीरित्या युक्तीवाद केला.

एका बारा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पिडीत बारा वर्षीय मुलीच्या आईने 10 जून 2022 रोजी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीतून केला होता. या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलीसांनी आरोपीविरुध्द भादंविच्या कलम 363 376 376 (3) 506 व 504 भांदवी व कलम 4 व 6 पोक्सो कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि आरोपीला तत्काळ अटक केली. त्यानंतर आरोपीने अमरावती येथील जिल्हा विषेश न्यायालय जामीनसाठी अर्ज दाखल केला होता. परंतू त्याचा जामीन ना मंजूर करण्यात आला.

# काका ने पुतण्याला बायको सोबत पाहिले नको त्या अवस्थेत आणि केले असे

**सुलतानगंज / नवप्रहार न्यूज नेटवर्क**

म्हणतात नं की प्रेमात जात-पात , जाती- धर्म , गरीब- श्रीमंत असा भेदभाव नसतो. प्रेमात वया चे ही बंधन नसते. प्रेमात वयाचे ही बंधन नसते प्रेम कुठल्याही वयात आणि कोणा सोबतही होऊ शकते. आता आम्ही तुम्हाला ज्या प्रकरणाबद्दल सांगत आहोत त्याबद्दल एकुन तुम्हालाही सहजासहजी विश्वास बसणार नाही. चला तर जाणून घेऊ या काय आहे हे प्रकरण.



प्रेमात जात धर्म आणि ईतर गोष्टी पहिल्या जात नसल्या तरी नात्या गोत्याचे भान ठेवणे आवश्यक असते. पण प्रेमात आंधळे झालेल्या लोकांना नात्या-गोत्याचे भान नसते हे अनेक प्रकरणातून समोर आले आहे. दिराच्या मुलासोबत म्हणजे पुतण्यासोबत काकीचे प्रेम प्रकरण उघड झाले आहे. सदर महिलाचा विवाह 2017 मध्ये झाला होता. लग्नानंतर जोडपे सुखी होते त्यांना एक मुलगाही झाला. हळूहळू प्रेमाने संसार सुरु होता. 4 वर्ष कोणाची नजर लागू नये असा हा संसार. पण त्यांचा संसाराला ग्रहण लागलं.

महिलेच्या मोठ्या दिराचा मुलगा त्यांच्याकडे राहायला आलं. सुरुवातीला सगळं ठिक होतं. पण पुतण्या काकीचं प्रेम संबंध सुरु झाले. यादोघांचे सूर जुळले अन् एक दिवशी कुटुंबियांनी त्या दोघांना आक्षेपार्ह अवस्थेत रंगेहात पकडलं. समाजात अब्रुचे धिंडवडे निघतील म्हणून घरच्यांनी त्यांना खूप समजवलं. पण प्रेमात ते दोघे वेडे होते. ते कोणाचही ऐकायला तयार नव्हते. सगळ्या प्रकारे त्या दोघांना समजविण्यात आलं. समाजात त्यांच्याकडे कसे नावं ठेवले जातील हेही सांगण्यात आलं. पण हे दोघे कोणाचंही ऐकत नव्हतं. कसालाही उपयोग झाला नाही.

अखेर हे प्रकरण पोलीस स्टेशनला पोहोचलं. महिलेने आपली मागणी महिला डेस्ककडे मांडली. पुतण्यालाही पोलिसांसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले. दोघांनीही आपण प्रेम केलं असून आपल्याला लग्न करायचं आहे असं सांगितलं. पोलिसांनीही त्यांना सगळ्या प्रकारे समज दिला पण ते पोलिसांनाही जुमानत नव्हते. अख्खा दिवस निघून गेला पण या प्रकरणाचा काही निर्णय लागत नव्हता. अखेर पुण्याचा काकाने म्हणजे महिलेच्या नवऱ्याने त्या दोघांना परिसरातील हनुमान मंदिरात घेऊन गेला आणि तिथे त्या दोघांचं लग्न लावून दिलं.

# जिवघेणा हल्ला करून शासकीय कंत्राटदाराला मागितली खंडणी

### दारूसाठी मागितले पैसे

### इतवारा बाजार परिसरातील घटना

**अमरावती**- दारू पिण्यासाठी पैसे मागून एका शासकीय कंत्राटदारावर चाकूने जिवघेणा करण्यात आला. ही धक्कादायक घटना इतवारा बाजारातील पिंजारा मस्जिदसमोर शनिवार, 17 जून रोजी दुपारच्या सुमारास घडली. निशांत मनोज गुप्ता (30, रा. मसानगंज) यांच्या तक्रारीवरून शहर कोतवाली पोलिसांनी आरोपी सोनु कैलास गुप्ता व अन्य एका अनोळखी इसमाविरुध्द जिवघेणा हल्ला करणे, खंडणी मागणे आणि धमकी देण्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

निशांत गुप्ता हे बांधकाम करणारे शासकीय कंत्राटदार असून, ते महापालिकेतील कामे करतात. 17 जून रोजी दुपारी 4 वाजताच्या सुमारास ते इतवारा बाजार येथील आपल्या कार्यालयात उपस्थित असताना, सोनु गुप्ता व एक अनोळखी इसम तेथे आले. त्यांनी दारू पिण्यासाठी निशांत यांना पैशांची मागणी केली. परंतु त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपी सोनु गुप्ताने खिश्यातील चाकू काढून निशांतवर चाकूने जिवघेणा हल्ला चढविला. दरम्यान झालेल्या आरडाओरडने परिसरातील नागरिक निशांत यांच्या कार्यालयाजवळ एकत्रित आले. त्यामुळे आरोपी सोनुसह अनोळखी व्यक्ती तेथून पळून गेले. त्यानंतर त्यांच्या कार्यालयामागे राहणारा निशांतच्या आत्याचा मुलगा कुमोद ईश्वर साहु याने तत्काळ निशांत यांना दुचाकीवर बसून जखमी अवस्थेत झेनिथ हॉस्पीटलला उपचारासाठी दाखल केले, असे निशांत यांनी तक्रारीत म्हटले आहे.